**केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना- पाणलोट विकास घटक २.० अंमलबजावणीकरिता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना २०२१ नुसार राज्यस्तरीय तांत्रिक समिती (SLTC) व जिल्हा पाणलोट कक्ष व माहिती केंद्र (WCDC) गठित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**मृद व जलसंधारण विभाग**

**शासन निर्णय क्र. केंपुयो २०२२/प्र.क्र.१५/जल-८**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक: २७ एप्रिल, २०२२.

<u>वाचा :</u>-१. मा. मुख्य सचिव तथा अध्यक्ष, शक्ती प्रदत्त समिती यांचे अध्यक्षेतखाली संपन्न झालेल्या दि. १६एप्रिल, २०२१ रोजीच्या १० व्या बैठकीतील ठराव क्रमांक ११ दि. १९ मे २०२१ रोजीचे इतिवृतांत.

२.मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा कृषि आयुक्त यांचे पत्र क्रमांक १० वी बैठक/अनुपालन अहवाल /३१६५९ दि. २४.०९.२०२१.

<u>प्रस्तावना :-</u>

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक२.० या योजनेतर्गत तयार केलेले सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेच्या मान्यतेसाठी बैठकीमध्ये सादरीकरण करण्यात येतात. बैठकीमध्ये सादर करावयाच्या प्रकल्प अहवलाची (DPR) संख्या जास्त असल्यामुळे बैठकीमधील बहुतांश कालावधी सादरीकरण करण्यासाठी व्यतीत होतो. त्यामुळे बैठकीमधील धोरणात्मक निर्णयासाठी ठेवलेल्या अन्य प्रस्तावांच्या चर्चेसाठी कमी वेळ मिळतो. ही बाब विचारात घेता, प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० ही योजना शासनाच्या विविध विभागांशी निगडीत असल्यामुळे तसेच सद्यस्थितीत कार्यान्वित असलेल्या केंद्र व राज्य पुरस्कृत राज्य योजनांच्या माध्यमातून होत असलेल्या गुंतवणुकीमध्ये एककेन्द्राभिमुखता साधावायचा असल्याने राज्यस्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा यांचे अध्यक्षतेखाली "राज्यस्तरीय तांत्रिक समिती (SLTC)" व सबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली " जिल्हा पाणलोट कक्ष व माहिती केंद्र (WCDC)" गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास योजने अंतर्गत समविष्ठ तांत्रिक विभागामधील समन्वय व आवश्यकतेनुसार क्षेत्रीय स्तरावरील यंत्रणेस सल्ला/मार्गदर्शन/अडचणीचे निराकरण/ शासन - प्रशासन स्तरावरील धोरणात्मक निर्णय देण्याकरिता मा. आयुक्त (मृद व जल संधारण) मृद व जल संधारण आयुक्तालय तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणज्ञ यांचे अध्यक्षेतखाली केंद्र पुरस्कृत योजनांच्या प्रभावी कामकाजासाठी "राज्यस्तरीय तांत्रिक समिती (SLTC)" व "जिल्हा पाणलोट कक्ष व माहिती केंद्र (WCDC)" गठीत करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

अ) **मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा तथा आयुक्त, (मृद व जलसंधारण ) मृद व जलसंधारण आयुक्तालय औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय तांत्रिक समितीची (SLTC) ची रचना खालीलप्रमाणे :-.**

| अ.क्र | अधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | आयुक्त, मृद व जलसंधारण, महाराष्ट्र राज्य, औरंगाबाद तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे | अध्यक्ष |
| २. | अप्पर आयुक्त , जलसंधारण तथा मुख्य अभियंता (मृद व जलसंधारण ) पुणे. | उपाध्यक्ष |
| ३ | आयुक्त (कृषि), पुणे | सदस्य |
| ४ | आयुक्त, मनरेगा, नागपूर | सदस्य |
| ५ | संचालक ,भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे | सदस्य |
| ६ | संचालक, सुदूर सवेदन उपाय योजना केंद्र,पुणे | सदस्य |
| ७ | मुख्य वन संरक्षक, वने | सदस्य |
| ८ | सह /उपसचिव, मृद व जल संधारण विभाग,मंत्रालय,मुंबई | सदस्य |
| ९ | अवर सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| १० | अध्यक्ष, जानपीर ग्रामविकास सेवाभावी संस्था, शिरपूर ता. आष्टी, जि. बीड | सदस्य |
| ११ | संचालक, मृद व जलसंधारण, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| १२ | अप्पर मुख्य कार्यकारी अधिकारी (तांत्रिक/प्रशासकीय ) | सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे-**

१) प्रकल्पाच्या गुणवत्तापूर्वक व जलद कार्यान्वयन करिता प्रकल्प स्तरावर चांगल्या दर्जाच्या कुशल व अनुभवी मनुष्यबळाची उपलबद्धता करणे

२) प्राथमिक प्रकल्प अहवाल व सविस्तर प्रकल्प अहवाल यांची छानणी करणे

३) पात्र ठरलेले सविस्तर प्रकल्प अहवालाची दुरुस्ती सुचविणे, सूचना करणे, पात्र ठरलेले सविस्तर प्रकल्प अहवाल राज्यस्तरीय नोडल एजन्सीकडे मंजूरीसाठी प्रस्तावित करणे.

४) राज्याच्या पाणलोट विकास प्रकल्पाचा आर्थिक नियोजन सह एकत्रित आराखडा तयार करणे.

५) पाणलोट विकासाचे वार्षिक आराखडे तयार करणे व धोरण ठरविण्यासाठी राज्यस्तरीय नोडल एजन्सीला सर्वोतोपरी साहय करणे.

६) राज्यस्तरीय नोडल एजन्सीने दिलेल्या सूचनेच्या अधिन राहून योजनेचे सहनियंत्रण करणे व प्रकल्प वेळेत पूर्ण होतील याची दक्षता घेणे.

७) प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-पाणलोट विकास घटक (PMKSY-WDC २.०) च्या नियोजन व अंमलबजावणीसाठी जिल्हा पाणलोट कक्ष व माहिती केंद्र (WCDC) व प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) यांना तांत्रिक मार्गदर्शन व साहय उपलब्ध करुन देणे.

वरील कार्यकक्षेच्या अधीन राहून तांत्रिक समितीने आपले कामकाज पार पाडावे.

**ब) जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा पाणलोट कक्ष व माहिती केंद्र (WCDC)ची रचना खालीलप्रमाणे :-**

| अ.क्र | अधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी ( जि.प) | सह अध्यक्ष |
| ३ | उपजिल्हाधिकारी (रोहयो) | सदस्य |
| ४ | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | सदस्य |
| ५ | उपसंचालक, सामाजिक वनिकरण | सदस्य |
| ६ | उपवनसंरक्षक, वन विभाग | सदस्य |
| ७ | जिल्हा जलसंधारण अधिकारी, लघुपाटबंधारे / जिल्हा परिषद | सदस्य |
| ८ | वरिष्ठ भू-वैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विभाग | सदस्य |
| ९ | जिल्हा पशुसंवधन, दुग्ध व्यवसाय अधिकारी | सदस्य |
| १० | जिल्हा  मत्स्य व्यवसायअधिकारी | सदस्य |
| ११ | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | सदस्य |
| १२ | जिल्हा विकास अधिकारी (NABARD) | सदस्य |
| १३ | जिल्हा जलसंधारण अधिकारी(मृद व जलसंधारण ) | प्रकल्प व्यवस्थापक तथा सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे-**

१. पाणलोट विकास प्रकल्पांचा एकत्रित आराखडा जिल्हा पाणलोट विकास नियोजन आराखडयाकरीता बनविणे. ज्यामध्ये आर्थिक नियोजनाचा समाविष्ट असेल.

२. पाणलोट विकासाकरिता राज्यस्तरीय नोडल समिती (SLNA) ने विहित केलेल्या पध्दतीनुसार प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणाच्या कामाचे सहनियंत्रण करणे व वेळोवेळी कामाचा आढावा घेऊन मार्गदर्शन करणे.

३. पाणलोट विकासाचे वार्षिक आराखडे बनविण्याकरीता व धोरण ठरविण्याकरिता राज्यस्तरीय नोडल समिती (SLNA) व राज्यस्तरीय तांत्रिक समिती (SLTC) ला सर्वोतोपरी सहाय्य करणे व सुविधा उपलब्ध करुन देणे.

४. उपजिविका व क्षमता बांधणीकरीता कृती आराखडा रिसोर्स ऑर्गनायझेशनचे सहभागान्वये तयार करणे व मान्यतेसाठी राज्यस्तरीय नोडल एजन्सीला सादर करणे.

५. जिल्हयात सुरु असलेल्या पाणलोट विकासाच्या सर्व राज्य व केंद्र पुरस्कृत योजनांचा एकत्रित आढावा घेणे, संनियंत्रण करणे व स्थानिक परिस्थितीनुसार मार्गदर्शक सूचनांच्या अधिन राहून योग्य दिशानिर्देश देणे.

६. पाणलोट विकास प्रकल्पास नियमितपणे निधी उपलब्ध होईल याची दक्षता घेणे.

७. विहित केलेली कागदपत्रे वेळोवेळी SLNA/SLTC ला मिळतील याची दक्षता घेणे.

८. कृषि, पशुसंवर्धन, ग्रामविकास, फलोत्पादन इ. कार्यक्रमांचा समन्वय पाणलोट विकास प्रकल्पाकरीता राखणे जेणेकरुन लाभार्थी यांची उत्पादकता व राहणीमान उंचावेल.

९. गावापासून जिल्हयापर्यंत पाणलोट विषयक Data Base तयार करुन घेणे तो SLNA व सेंट्रल डाटा एजन्सीला जोडणे

१०. पाणलोट विकास प्रकल्पाचे नियोजन व अंमलबजावणीकरीता प्रकल्प कार्यान्वीत अभिकरणास तांत्रिक सहाय्य उपलब्ध करुन देणे.

११. योजनेच्या प्रभावी अंमजबजावणीसाठी राज्यस्तरीय नोडल एजन्सीमार्फत सुचीबध्द केलेल्या विविध यंत्रणामार्फत कामाचे सनियंत्रण करणे.

योजनेच्या प्रभावी अमंजबजावणीसाठी शासन स्तरावरुन आवश्यकतेनुसार स्वतंत्रपणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येतील.

तसेच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना २०२१ मधिल परिच्छेद क्र ९ नुसार प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० ही योजना कार्यरत राहील.

हा शासन निर्णय केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना २०२१ मधील सूचनेस अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२२०४२७१७५५२९८४२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

SHUBHANGI ASHAY POTE

Digitally signed by SHUBHANGI ASHAY POTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SOIL AND WATER CONSERVATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f67e195634f0df9371bbf2f3aca86f9d3e8da3b165ed00c4c12c06e309cd2784, pseudonym=DAD653D6BA3164645B65E9411C151EE25201A1D8, serialNumber=1A3686057BA0418SADD8654EDEC4DE91E5E9AA1E243BAE1702175810F69A3E15, cn=SHUBHANGI ASHAY POTE
Date: 2022.04.29 17:30:26 +05'30'

**( शुभांगी पोटे )**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. सचिव (जलसंधारण ), मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य,
४. आयुक्त, मृद व जसलंधारण, महाराष्ट्र राज्य, औरंगाबाद
५. अपर आयुक्त, जलसंधारण तथा मुख्य अभियंता (मृद व जलसंधारण), पुणे
६. आयुक्त, मनरेगा, नागपूर
७. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
८. संचालक, सुदूर सवेदन उपाय योजना केंद्र, पुणै
९. प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. आयुक्त (मृद व जलसंधारण , औरंगाबाद ) तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा , महाराष्ट्र राज्य, पुणे
११. आयुक्त (कृषि), पुणे,
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.)
१३. सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)
१४. सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा
१५. सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण
१६. सर्व उपवनसंरक्षक, वन विभाग
१७. वरिष्ठ भू-वैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विभाग, पुणे
१८. सर्व जिल्हा जलसंधारण अधिकारी, लघुपाटबंधारे(जि.प)
१९. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी

२०. सर्व जिल्हा जलसंधारण अधिकारी (मृद व जलसंधारण)
२१. सर्व जिल्हा विकास अधिकारी (NABARD)
२२. अध्यक्ष जानपीर ग्रामविकास सेवाभावी संस्था, शिरपूर ता. आष्टी, जि. बीड
२३. सहसचिव/उपसचिव मृद व जलसंधारण विभाग ,मंत्रायल, मुंबई
२४. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन , महाराष्ट्र राज्य, पुणे
२५. अपर मुख्य कार्याकारी अधिकारी (तांत्रिक/प्रशासकीय), वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे.
२६. अपर मुख्य कार्यकारी अधिकारी (कृषि), वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा, पुणे
२७. विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)
२८. सर्व उपसचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
२९. निवड नस्ती जल (८), मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.